# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 90 /2020** **दिनांक: 20 / 03 /2020**

## *कोव्हीड- १९ आदेश*

**देशी विदेशी दारुचे दुकाने, परमिट रुम, (बार) , बियर शॉपी, सर्व देशी मद्यविक्रीच्या किरकोळ अनुज्ञप्ती बंद करणे बाबत**

**वाचा -**
1. **आपत्ती व्यवस्थापन कायदा -२००५**
2. **प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १४ मार्च, २०२०**
3. **साथरोग अधिनियम,१८९७**
4. **सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०**
5. **महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील कलम 142**

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड - १९ कोरोना विषाणू वर उपाययोजना **नियम-२०२०** नुसार दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील **नियम क्र. ३** नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्या अर्थी,** सध्या देशात आणि राज्यात कोरोना (कोव्हीड १९) चा फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, मद्य व मद्यसेवन करण्याकरिता बहुतांश नागरीक दुकान, बार, रेस्टॉरेंट इत्यादी ठिकाणी एकत्र येतात व त्यामुळे संसर्गजन्य आजार उद्भवून कोरोणा विषाणूचा फेलाव व प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अकोला जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व देशी विदेशी दारुचे दुकाने, परमिट रुम, (बार) , बियर शॉपी, सर्व देशी मद्यविक्रीच्या किरकोळ अनुज्ञप्ती बंद करणे बाबत माझी खात्री झाली आहे.

**त्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा- २००५ , साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४ व महाराष्ट्र शासनाची दिनांक १४ मार्च २०२० चे अधिसूचनेनुसार तसेच महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील कलम 142 नुसार** मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार **मी, जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** अकोला जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील **वाईन शॉप FL-II सर्व देशी विदेशी दारुचे दुकाने CL-III, सर्व परमिट रुम, (बार) FL-III, सर्व बियर शॉपी FL-BR II क्लब FL-IV सर्व**

..२..

NitinN 69

**देशी मद्यविक्रीच्या किरकोळ व ठोक अनुज्ञप्ती दिनांक २५.०३.२०२० पर्यंत पूर्णतः बंद करण्याचे याद्वारे आदेश पारीत करीत आहे.** सदरचे आदेश **दिनांक २१.०३.२०२० चे सकाळी ६.०० वाजेपासून अंमलात येतील.**

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८** अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक २० मार्च २०२०** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.**)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
यांना माहिती करिता सादर
४. **जिल्हा पोलीस अधिक्षक**, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
५. **आयुक्त महानगर पालिका,** अकोला अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
६. **आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला /जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला / जिल्हा आरोग्य अधिकारी**, यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
७. **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी/ तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी** -------------- सर्व.
८. **अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभाग, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर आदेशात नमूद केल्यानुसार आदेशाची अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी.**
९. **पोलीस निरिक्षक**--------------------------- **सर्व**
१०. **मुख्याधिकारी** ------------------------------------------ मार्फत **जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला,** यांनी नगर परिषद / नगर पंचायत कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.
११. **जिल्हा माहिती अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**